**प्रेस नोट** दिनांक २६/०७/२०२४

वरळी पोलीस ठाणे गु.र.क्र ३८९/२०२४, कलम १०३(१), ६१(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये दाखल गुन्ह्यातील मयत इसम श्री गुरूसिध्दप्पा अंबादास वाघमारे, वय– ५० वर्षे, रा.ठिः– डॉ आंबेडकर नगर, बगुभाई निवास, रूम नं १४६, एम.सी.छागला मार्ग, विलेपार्ले (पु), मुंबई हा दिनांक २४/०७/२०२४ रोजी त्यांची मैत्रिण व मित्रांसह अपर्णा बार, सायन याठिकाणी पार्टी करून मैत्रिण काम करीत असलेला ''सॉफ्ट टच स्पा'' एल.आर. पापण रोड, बी.एम.सी हबच्या समोर, वरळी, मुंबई याठिकाणी रात्री ००.३० वाजताच्या सुमारास आले व रात्री ०२.०० वा. सुमारास नमुद स्पा मधील ०३ कामगार बाहेर गेल्यानंतर स्पा चे शटर उघडुन ०२ अनोळखी इसम स्पा मध्ये आले व त्यांनी गुरूसिध्दप्पा अंबादास वाघमारे, वय ५० वर्षे यांचे गळयावर, पोटावर व हातावर धारधार शस्त्राने वार करून ठार मारले.

नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने गुन्हयातील मुख्य सुत्रधार नामे श्री संतोष सोपान शेरेकर वय ५४ वर्षे याने मयत इसम हा त्यांच्या स्पा विरोधात पोलीस ठाणेस तसेच इतर कार्यालयात तक्रारी करून त्रास देत असल्याने दोन इसमांना सुपारी देवुन खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २५/०७/२०२४ रोजी अटक करण्यात आलेली असुन नमुद आरोपी दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत आहे. तसेच नमुद गुन्हयातील उर्वरीत दोन आरोपी नामे १) मोहम्मद फिरोज इस्माउद्दीन अन्सारी २) साकिब सरफराज अन्सारी यांना दिनांक २६/०७/२०२४ रोजी अटक करण्यात आलेली असुन दोन्ही आरोपी दिनांक ३०/०७/२०२४ पर्यंत पोलीस कोठडीत आहे. नमुद गुन्हयाचा तपास चालु आहे.

* * *